**प्रेस नोट** **दि.१७/०३/२०१९**

## खडकी पोलीस स्टेशन पुणे शहर

## रिक्षात विसलेली बॅग पोलीसांनी केली परत

दि.१५/०३/२०१९ रोजी दुपारी १६/०० वा. चे सुमारास इसम नामे सलमान फारुकी,वय २५ वर्षे धंदा शिक्षण,रा.मुंबई हा त्याची परिक्षा असल्याने पुण्यात आला होता. तो रिक्षाव्दारे खडकी पोलीस ठाणे कार्यक्षेत्रातील साईमंदिर,रेंजहिल,पुणे येथे आला असता तो साई मंदिरा जवळ रिक्षा थांबला असता तो पेपर घेणेसाठी रिक्षातुन खाली उतरला. त्यावेळी रिक्षामध्ये त्याची बॅग होती व सदर बॅगेमध्ये त्याचा मोबाईल, किंमती घडयाळ, परिक्षेचे हॉल तिकीट इत्यादी वस्तु होत्या. रिक्षा चालकास सदर इसम रिक्षाखाली उतरल्याचे समजुन न आल्याने तो पुढे निघुन गेला. त्यामुळे सदर इसम खडकी पोलीस ठाणेस मदतीचे अपेक्षेणे आला असता पो.शि. ८८३७ तुषार शिंदे, खडकी पोलीस ठाणे पुणे शहर यांनी त्याचे म्हणणे समजुन घेतले व साईमंदिर रेंजहिल पुणे येथीस सी. सी. टी. व्ही. कॅमेरे चेक करुन,त्याव्दारे सदर रिक्षाचा नंबर शोधुन त्याव्दारे रिक्षा मालकाचा नाव पत्ता व मोबाईल नंबरचा शोध घेतला. त्यामुळे रिक्षाचालक ज्ञानोबा शिंदे हा असुन रिक्षाचा नंबर एम.एच.१२/जे.एस./५६९० असा असल्याची माहिती प्राप्त झाली. त्यानुसार रिक्षा चालकाशी संपर्क साधुन त्याचे रिक्षामध्ये इसम सलमान फारुकी याची बॅग विसरली असल्याचे सांगितले त्यावर सदर रिक्षाचालकाने त्याचे रिक्षामध्ये विसरलेली बॅग आणुन हजर केली. सदर बॅग पो.शि.८८३७, शिंदे यांनी इसम नामे सलमान फारुकी यांचे ताब्यात आहे त्या परिस्थितीत दिली आहे.

**( भागवत मिसाळ )**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
खडकी पोलीस स्टेशन, पुणे.